जगभर

# करोनाचे योगदान

## चन्द्रशेखर पुरन्दरे

करोनाच्या जागतिक संकटाचा परामर्श मुख्यत: बाधितांची व मृतांची आकडेवारी, किती देशात प्रादुर्भाव होत आहे या अंगाने घेतला जातो. इतर संलग्न गोष्टी दुर्लक्षित रहातात. त्यातील प्रमुख म्हणजे विषमता. विषमतेच्या आढाव्याबरोबर सांस्कृतिक घटक व काही आंतरराष्ट्रीय संकेत उद्बोधक ठरावेत.

प्रथम विषमता. ही अनेक प्रकारची असते. प्रत्येक प्रकारातही अनेक उपप्रकार असतात. त्यामुळे तिचे बळी त्या त्या प्रकारचे म्हणजे विभिन्न असतात. आहे-रे - नाही-रे वर्गातील तफावत ही दृश्य आर्थिक विषमता. एखाद्या वंशाच्या लोकांना विकाराच्या प्रसाराबाबत जबाबदार धरणे किंवा त्यांच्यापर्यंत उपाययोजना पोचवण्यात सापत्नभाव दाखवणे ही वांशिक विषमता [वर्णाधिष्ठित विषमता, राष्ट्रीय किंवा प्रादेशिक अस्मितेवर आधारित विषमता या याच वांशिक विषमतेचे उपप्रकार]. धार्मिक विषमता प्रमुख दोन प्रकारची - एक धर्मांतर्गत, दुसरी दोन निराळ्या धर्मातील, वगैरे अनेक प्रकारच्या विषमता. प्रत्येक समाजाची आजवर झाकलेली लक्तरे उघड्यावर आली आहेत व येत आहेत.

सगळा सविस्तर आढावा लेखमर्यादेत शक्य नाही म्हणून केवळ त्रोटक उदाहरणे दिली आहेत.

**आर्थिक विषमता**

दिल्ली सोडून पायी जाणारे मजुरांचे जथ्थे, मुंबईच्या वांद्रा स्टेशनवर झुंबड, सुरतमध्ये तोच प्रकार. ही दृश्य आर्थिक विषमता. हा मध्यम-उच्चवर्गाला सहानुभूत असणाऱ्या, तळागाळाशी सम्बन्ध तुटलेल्या संवेदनाहीन सरकारच्या करोनानियंत्रण धोरणाचा परिणाम. हातावर पोट असणारे घरी बसू शकत नाहीत. एकमेकांपासून एक मीटर अंतर ठेवा हा आदेश पाळणे निम्न, उच्च मध्यमवर्गाला किंवा श्रीमंतांना शक्य असेल. धारावीसारख्या ठिकाणी एक शौचालय काहीशे लोकांच्यात असते, तेथे हा आदेश लागू होऊ शकत नाही. याची जाणीव नसणारे सरकार आपल्याकडेच आहे असे नाही, द. आफ्रिका देशातही आहे. तेथील केप टाउन शहराच्या झोपडपट्टीत १२ ते १५ लोक पत्र्याच्या छताच्या एका खोलीत रहातात. एक सामूहिक नळ पाणी पुरवतो. एक शौचालय अनेकांना वापरावे लागते. तेथील रहिवाशांच्या मते ते रस्त्यावर सामाजिक अंतर पाळू शकतात, राहत्या ठिकाणी नाही. आणि रस्त्यावर पडायला तर सरकारने बंदी केली आहे. अशा परिस्थितीत व्हायरसचा प्रसार होणे अटळ आहे. द. आफ्रिकेतील एड्सच्या साथीचे निरीक्षण असे होते की एड्सचा प्रसार गरीबी, स्त्री-पुरुष भेद आणि सामाजिक हिंसा यांच्यामुळे वाढतो. करोनाचा प्रादुर्भाव याच प्रकारे होण्याची दाट शक्यता आहे.

दिल्ली, मुंबई सोडू पहाणाऱ्या शेकडो मजुरांसारखीच वेळ द. अमेरिकेत आलेली आहे. तेथील व्हेनेझुएला या देशातून तिथल्या हलाखीच्या परिस्थितीने शेजारच्या कोलंबिया देशात कित्येक मजूर मजबुरीने आलेले आहेत. त्यातील बहुतेक कोलंबिया सरकारच्या नोंदीतच नाहीत. ते बेकायदेशीर रहिवाशी आहेत, त्यामुळे त्यांना कोलंबियाच्या अधिकृत नागरिकांना मिळणारे जगण्यासाठीचे किमान वेतन, आरोग्य-सेवा, इत्यादी उपलब्ध नाहीत. करोनाच्या आगमनाने त्यांची उपजीविका धोक्यात आली आहे. वाहतूक बंद झाल्याने तेथेही अनेकजण पायी चालत मायदेशी परतू लागले आहेत.

आर्थिक विषमतेचा एक उप-प्रकार म्हणजे रस्त्यावर राहणारी मुले. ही तर ना शासनाच्या ना जन-आंदोलनांच्या गणतीत/दखलीत. येणाऱ्या जाणाऱ्या मोटारगाड्या सिग्नलला साफ करणे, तेथे लोकांना फुले, झेंडे, गाड्या साफ करण्याची कापडे अशा वस्तू विकणे आणि रस्त्यावरच रहाणे, हे त्यांचे जीवन. ती रस्त्यावर आली ती प्रामुख्याने घरातील वातावरणातून सुटका

म्हणून - हिंसाचार, व्यसनी आई-बाप, वगैरे. त्या प्रश्नांना सरकार व्यवस्थात्मक सामोरे जात नाही. सरकारच्या दृष्टीने ही मुले अदृश्य व्हावीत. विकसनशील देशांत हे 'धोरण'. त्यांना पर्याय न देता आज अनेक देशांत रस्त्यावर रहाणे करोनामुळे बंद करण्यात आले आहे. मोम्बासा या केनियातील मोठ्या शहरातील अशा एका मुलाच्या शब्दांत 'आता जर पोलिसांनी आम्हाला तुरुंगात टाकले तर बरेच. तिथे निदान खायला तरी मिळेल, निवारा मिळेल. श्रीमंताना घरी रहाणे परवडते कारण घरी अन्नाचा साठा असतो. आमचा अन्नाचा सगळा साठा आमच्या पोटात.' या मुलांना जेवण आजवर शहरातील रेस्टॉरंट्स, हॉटेल्स देत असत. ती आता बंद झाली आहेत. 'आम्ही करोनाने मरणार का भुकेने' हा भारतातील मजुरांचा प्रश्न ती मुलेही विचारत आहेत.

आर्थिक विषमता करोनामुळे अतिशय तीव्र होईल. जगात आजच साडेतेरा कोटी लोकांची उपासमार होते. त्यात १३ कोटींची भर पडेल असा अंदाज आहे. काम बंद, उपजीविका नाही, रोख शिल्लक नाही ही आजची परिस्थिती. त्यात अल्पावधीतच शेतीवर परिणाम होऊन अन्नाची टंचाई येईल.

**वांशिक विषमता**

चीनमध्ये गुआंगझोऊ या शहरात अनेक आफ्रिकनांना घरमालकांनी करोनानंतर रातोरात बाहेर काढले. प्रसंगी पोलिसांच्या सहाय्याने. गेल्या कित्येक महिन्यात हे आफ्रिकन बाहेरच्या देशातून प्रवास करून आलेले नाहीत किंवा करोनाच्या संसर्गातही नव्हते. तरीही त्यांना सक्तीने अलग करण्यात येत आहे.त्यांना रात्र काढायला हॉटेलही मिळत नाही. रस्त्यावर रहाण्याची वेळ आलेली आहे. रस्त्यावरूनही पोलीस हुसकावून लावतात. त्यांनी एकत्र येऊन रस्त्यावर हिंडणे पोलिसांना मान्य नाही त्यामुळे ते एकेकटे रस्त्यावर भटकत रहातात. काही स्वयंसेवी संघटना यांना मदत करू पहातात, त्यांचाही पोलिसी छळ होतो. वुहान शहरात करोनाचा जन्म झाला. तेथील एका व्हीडिओमध्ये चिनी पोलीस एका आफ्रिकनाला धक्काबुक्की करून चौकशीसाठी नेताना दिसतात. हा व्हीडिओ आफ्रिकेत सर्वत्र दाखवला गेला. आफ्रिकेत चीनची मोठी आर्थिक गुंतवणूक आहे. तसेच आफ्रिकेत दहा लाखाहून अधिक चिनी आहेत. त्यांच्यावर जर अशा प्रसंगांची हिंसक प्रतिक्रिया उमटली आणि तेथील जनमत चीनविरुद्ध गेले तर ते चीनला परवडणार नाही.

अमेरिका देशात कृष्णवर्णीय व लॅटिन अमेरिकन यांच्यात अपुऱ्या आरोग्यसेवेमुळे विकाराचा प्रादुर्भाव व मृत्यू गोऱ्यांपेक्षा जास्त आहेत. तेथे वांशिक विषमता तद्देशीय अमेरिकनांच्या बाबतही आढळते. तद्देशीय म्हणजे अमेरिका खंडातील आदिम रहिवासी. ते उत्तर व दक्षिण अमेरिकेतील देशांत आहेत. अमेरिका देशातील ५२ लाख आदिम अमेरिकन्समध्ये हृदय विकार, डायबेटीस आधीच जास्त असतात. त्यात आरोग्यसेवेचा अभाव, गरीबी यांची भर आहे. छोट्या घरात अनेक लोक एकत्र रहातात. म्हणजे सामाजिक अंतर शक्य नाही. अशा परिस्थितीत व्हायरस सहज पसरू शकतो. तसे व्हायला सुरुवात झालीही आहे.

ब्राझीलमध्ये हे तद्देशीय लोक पिढ्यांपिढ्या आजवर दुर्गम प्रदेशात, अमेझॉनच्या जंगलात रहात आलेले आहेत. ते राष्ट्रीय आरोग्य सेवेपासून दूर असतात आणि तेथे प्राथमिक सोयीही नसतात. आधुनिक समाजातून येणाऱ्या नव्या विकारांविरुद्ध त्यांची प्रतिकारशक्ती मुळातच कमी असते. त्यात करोनाविरुद्ध तर नाहीच. एक १५ वर्षाचा मुलगा जवळच्या शहरात शिकायला रहात होता. तो करोना घेऊन मूळ गावी आला आणि मरण पावला. या दुर्लक्षित समूहात त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात खूप जास्त बळी पडणे संभवनीय आहे. त्यात ब्राझीलचा अध्यक्ष करोनाचे गांभीर्य राष्ट्रीय स्तरावरच नाकारतो!

**धार्मिक विषमता**

एखाद्या धर्मातील विशिष्ट पंथाच्या अनुयायांनी एकेमकांपासून सार्वजनिक ठिकाणी अंतर राखण्याचा आदेश नाकारणे. उदा. पाकिस्तानातील ५० मुल्लांचा त्यांच्या त्यांच्या मशिदींमध्ये लॉकडाऊन दरम्यान नमाज एकत्रित पढण्याचा आग्रह आहे. तर तसे करू नये असा सौदी सर्वोच्च धर्मगुरूचा सल्ला आहे. [सौदी अरेबियाने तेथील मशिदी बंद केल्या आहेत]. जॉर्जिया देशात ख्रिश्चन ऑर्थोडॉक्स या पंथाचे चर्च प्रबळ आहे. देशात लॉकडाऊन असतानाही ते तो जुमानत नाहीत

व चर्चमध्ये कार्यक्रम साजरे करतात. त्याला मोठ्या संख्येने भक्त हजरही रहातात. ही धर्मांतर्गत विषमता. पाकिस्तानात लॉकडाऊन दरम्यान गरीबांना दिले जाणारे सरकारी अन्नधान्य काही ठिकाणी फक्त मुस्लिमांना दिले जाते, हिंदूंना व ख्रिश्चनांना नाकारले जाते. ही दोन धर्मातील विषमता.

**सांस्कृतिक घटक**

इराकमध्ये एखाद्याला विकार आहे हे समाजाला माहित होणे हा त्या माणसाच्या दृष्टीने अतिशय शरमेचा प्रकार, सामाजिक कलंक असतो. त्यामुळे तेथील संभाव्य रुग्ण आरोग्यसेवाधिकाऱ्यांना विनंती करतात की तुम्ही तुमच्या काफिल्यासह घरी येऊ नका. शेजाऱ्यांना कळेल की येथे रुग्ण आहे. इराणहून इराकींची मोठी आवक-जावक आहे. इराण तर व्याधिग्रस्त देश आहे. पण इराकमध्ये बाधितांची संख्या संशयास्पद कमी आहे. कारण लोक असह्य होईपर्यंत विकार झाकून ठेवतात.

आणखी एक सांस्कृतिक घटक पारंपरिक समाजात आढळतो. वृद्ध इसम करोनाला बळी पडणे अधिक शक्य असते. म्हणून त्यांना कुटुंबापासून वेगळे ठेवा असा आदेश हे समूह मानत नाहीत. त्यांच्या संस्कारानुसार वृद्ध हा आदरणीय ठेवा असतो, तो नव्या पिढीला शिकवतो. तो कुटुंबाचा महत्त्वाचा सदस्य असतो.

**अनपेक्षित घडामोडी**

* गेली पाच वर्षे सौदी अरेबियाने येमेनवर युद्ध लादले. ते वस्तुत: पडद्यामागचे इराणविरुद्धचे युद्ध. या युद्धात आजवर लाखाहून अधिक बळी पडले आहेत. करोनाच्या उदयानंतर सौदीने एकतर्फी युद्धविराम जाहीर केला. निदान त्या अनावश्यक नरसंहाराचा आतातरी शेवट झाला असावा.
* द. चीन समुद्राच्या १३ लाख चौरस कि.मी. क्षेत्रावर चीन आपली मालकी सांगतो. त्यात असणाऱ्या व्हिएतनाम, मलेशिया, फिलिपिन्स वगैरे संबंधित देशांना हा दावा मंजूर नाही. [या प्रश्नाचा सविस्तर आढावा *आंदोलन, मार्च २०१४* मध्ये घेतला आहे - *'जलकलह'* ]. त्यांना पाठिंबा म्हणून अमेरिकन आरमार तेथे आपल्या युद्धनौका फिरवत असते. करोनामुळे यातील नौकांवरील खलाशी ग्रस्त झाले आणि अमेरिकेची गस्त दुबळी झाली. याचा फायदा चीन घेत आहे. त्याने नुकतीच तेथे एक मासेमारी करणारी व्हिएतनामी बोट बुडवली. व्हिएतनामच्या मते ती बोट त्या देशाच्याच सागरी हद्दीत होती. चीनचा उलट दावा.
* ट्रम्प महाशयांनी त्यांच्या खास अदूरदर्शी, आततायी व धक्कादायक शैलीत जागतिक आरोग्य संघटनेची [WHOची] अमेरिकन मदत दोन ते तीन महिने स्थगित केली आहे. त्यांच्या मते करोना संकट WHO ने नीट हाताळले नाही. वस्तुत: जे आरोप ट्रम्प WHO वर करत आहे, ते सगळे ट्रम्पलाच लागू पडतात. आपले अपयश झाकण्याचा ट्रम्पचा हा प्रयत्न आहे. प्रथम व्हायरसचे गांभीर्य लक्षात न घेणे, लोकांना त्याची जाणीव न करू देणे, करायची तेव्हा उपाययोजना न करणे यामुळे आजवर ४० हजारहून अधिक अमेरिकन मरण पावले आहेत. आपले अपयश दुसऱ्यावर ढकलणे हा शैलीचा एक भाग. दुसरा म्हणजे, अमेरिका कोणत्याही आंतरराष्ट्रीय संघटनेचा सदस्य असणे ट्रम्पला पहिल्यापासून नामंजूर आहे. पर्यावरणाच्या रक्षणासाठीच्या आंतरराष्ट्रीय करारातून अमेरिका २०१७ ला या दुराग्रहाने एकतर्फी बाहेर पडली. WHO ही एकच जागतिक संघटना आज करोनाचा प्रतिकार त्या स्तरावर करत आहे. अशा वेळी जास्तीत जास्त आर्थिक मदत करणाऱ्याने ती थांबवणे अनैतिक आहे आणि जगाच्या दृष्टीने हितावह नाही.
* चीनने आधी दिलेली वुहानमधील मृतांची आकडेवारी एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात बदलली. नव्या माहितीनुसार, अडीच हजार नाही, चार हजार लोक मरण पावले. त्यावरही जगात संशय व्यक्त होत आहे. खेरीज, व्हायरस वुहानमधील प्रयोगशाळेत निर्माण करण्यात आला, तेथील एका कर्मचाऱ्याला लागण होऊन तो बाहेर पसरला असाही दावा आहे. अमेरिका त्याचा पाठपुरावा करत आहे.
* द. कोरियात बरे झाले म्हणून सोडण्यात आलेले करोनाचे १६३ रुग्ण पुन्हा positive असल्याचे आढळले आहे. म्हणजे, पहिला अंक संपायच्या

आता पुढच्या अंकाची नांदी सुरू झालेली दिसते.

* पुढचा मोठा टप्पा आफ्रिकेत आला तर मानवी वेदना अधिक तीव्र होईल. तेथे मूलभूत आरोग्यसेवा सोडाच, पाणी आणि साबण या प्राथमिक गोष्टीही अनेक देशांत बहुसंख्यांना उपलब्ध नाहीत. आफ्रिकेतील ५५ देशातील १० देशांत एकही ventilator नाही. ४१ देशात कित्येक कोटी लोकांसाठी २००० व्हेंटीलेटर्स आहेत. अमेरिकेत एक लाख सत्तर हजार.

**निरीक्षण**

एक - या साथीने प्रत्येक समाजातील विषमता विदारकपणे समोर आणली आहे. किमान मानवी प्रतिष्ठेने जगण्यासाठीच्या मूलभूत गरजा न पुरवणे हा बहुतेक देशांचा अक्षम्य गुन्हा दशकानुदशके चालत आलेला आहे. त्या व्यवस्थात्मक दंभाचे पितळ उघडे पडले आहे.

दोन - करोनापुढे आस्तिक आणि नास्तिक, रंक आणि राव सारखेच. त्यामुळे समाजाचे तसे विभाजन करणारे व तशी उतरंड रचणारे धर्म, उजवे-डावे-आणि-मधले-अनेक आदर्शवाद यांचा पोकळपणा दिसून आला आहे.

तीन - करोना देशाच्या सीमा मानत नाही.

परिणामत: यातील एखाद्या स्तंभावर आधारित देशोदेशीचे नेतृत्व करोनाबाबत सारखेच संभ्रमित आहे. [इराण - धार्मिक नेतृत्व, युरोप-उजवे-मध्यममार्गी नेतृत्व, अमेरिका - उजवे नेतृत्व, चीन - म्हणायला डावे नेतृत्व आणि प्रत्येकजण स्वघोषित 'राष्ट्रवादी']. मानवनिर्मित प्रचलित विचारसरणींची [त्यात विज्ञानही आले] आजची धडपड प्रसंगानंतर धावपळ, आग लागल्यानंतर ती विझवण्याचा प्रयत्न अशी दिसते. त्याचे संभाव्य कारण म्हणजे करोनाच्या संदर्भात या विचारसरणी ज्ञान नाहीत, भ्रम ठरल्या आहेत. हे दर्शन कमालीच्या क्लेशकारक पद्धतीने होत आहे. करोनाचे ते योगदान आहे.

www.purandarearts.com
www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk